संक्षिप्त

अदिती हेगडेला सुवर्णासह चार रौप्यपदके

नाशिक : 'स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया'यांच्या वतीने आयोजित ७७ व्या वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत नाशिकच्या अदिती हेगडेने महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करतांना एक सुवर्ण आणि चार रौप्य पदकांची कमाई केली. कर्नाटकातील मंगलोर येथे ही स्पर्धा झाली. अदितीने चार बाय १०० मीटर मिक्स फ्री स्टाइल रिले प्रकारात सुवर्णपदक तर १०० मीटर आणि २०० मीटर फ्री स्टाईल, चार बाय २००, चार बाय १०० मिडले, चार बाय १०० मिक्स मिडले रिले या प्रकारांमध्ये रौप्य पदक मिळविले. अदिती राजमाता जिजाऊ जलतरण तलावावर सराव करत आहे.

घोटी येथे शेतकरी मॉल

इगतपुरी खरेदी विक्री संघाकडून उभारणीची तयारी; वार्षिक सभेत ठराव

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : मागील पाच वर्षांपासून नफ्यात असलेल्या इगतपुरी तालुका सहकारी खरेदी विक्री संघाने घोटी येथे शेतकरी मॉल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. घोटी येथे झालेल्या संघाच्या ८२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत यासंदर्भात ठराव करण्यात आला.

आर्थिक डबघाईस आलेला संघ गेल्या पाच वर्षांपासून नफ्यात आहे. त्यामुळे पुढील नियोजनामध्ये शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाळा गव्हाणे हे होते. सभा माजी आमदार शिवराम झोले, ॲड. संदीप गुळवे आणि संचालक ज्ञानेश्वर लहाने यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली.

इगतपुरी हा भात शेतीसाठी ओळखला जाणार तालुका आहे. आता बागायत शेतीकडेही इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचा कल वाढल्याने आधुनिक यंत्रांचा मोठ्या प्रमाणात शेतकरी वापर करू लागला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना रास्त दरात अवजारे मिळावीत यासाठी खरेदी विक्री संघाच्या वतीने शेतकरी ॲग्रो मॉल उभारण्याचा ठराव या वार्षिक सभेत करण्यात आला. इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसह इतर जवळच्या जिल्ह्यांनाही या मॉलचा फायदा होणार असल्याचे संचालक देविदास जाधव यांनी सांगितले. इतर ठरावांवरही सभेत चर्चा करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष भरत कातोरे, संचालक देविदास जाधव, अरुण गायकर, जयराम धांडे, सुनील जाधव, संजय जाधव, समाधान वारुंगसे, मोहन भोर, माजी सरपंच पांडुरंग खातळे, सुनीता गुळवे, आशाबाई देवगिरे, अनिल तोकडे, रमेश धांडे, देवराम म्हसने, संजय खातळे, खंडेराव झनकर हेही उपस्थित होते. ठरावाचे वाचन संस्थेचे व्यवस्थापक एस. के. उदावंत यांनी केले.

पोलीस कारवाईच्या निषेधार्थ ठाकरे गटाचे आंदोलन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरात अवैध व्यावसायिक, खंडणीखोर आणि गुन्हेगारांचे पोलिसांशी संगनमत असल्याचा आरोप करुन ठराविक पक्षाच्या नेत्यांना लक्ष्य करून सुरू असलेल्या कारवाया थांबवाव्यात, या मागणीसाठी बुधवारी शिवसेना ठाकरे गट महिला आघाडीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले.

पोलिसांकडून केवळ राजकीय सुडापोटी ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर कारवाई सुरू आहे. ॲड. प्रशांत जाधव यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणात अंबड पोलिसांनी शिवसैनिक अंकुश शेवाळेला अटक केली. जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांना विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, बदनाम करण्यासाठी त्यांचा मुलगा दीपक यास या गुन्ह्यात गोवण्याचा कट रचला जात असल्याचा आरोप करुन आंदोलकांनी याचा निषेध केला.

लोकसभा निवडणुकीवेळी पोलिसांनी बडगुजर यांना तडिपारीची नोटीस काढली होती. तीच कार्यपध्दती आताही अवलंबून त्यांना अडकवण्याचा प्रयत्न होत आहे. पोलीस कर्मचारी व उपरोक्त प्रकरणातील तक्रारदार ॲड. जाधव यांनी संगमनताने अनेकांना धमकावून खंडणी वसूल केली. अनेक गुन्हे दडवल्याचा आरोप आंदोलकांनी केला. जाधव यांनी वकिलीची सनद मिळवताना गुन्ह्याबाबतची माहिती लपवून ठेवली, संबंधितास कोणत्या पोलीस ठाण्यातून ना हरकत दाखला मिळाला, याची चौकशी करण्याची मागणी केली. सिडकोतील पवननगर येथे डिसेंबर २०२३ मध्ये रात्री गोळीबार झाला होता. यात संशयिताबरोबर भाजपचा माजी नगरसेवक मुकेश सहाणेसह इतर जण होते. संशयिताने सहाणे यांनी बडगुजर यांच्यावर गोळीबार करण्याचा जबाब दिला आहे. हे सर्व पोलीस नोंदीत असताना या प्रकरणात सहाणे यांना अटक झाली नसल्याकडे आंदोलकांनी लक्ष वेधले.

सरकारी योजनांसाठी रायुकाँची स्वाक्षरी मोहीम

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : महायुती सरकारने सुरू केलेल्या योजना सुरळीत सुरू राहाव्यात, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.

योजना जनतेपर्यंत पोहचविण्याच्या सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबई प्रदेशाध्यक्ष समीर भुजबळ आणि युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी रणनीती आखली आहे. लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळत राहण्यासाठी तसेच लाभ मिळण्यात कोणत्या अडचणी येत आहेत, हे पाहण्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविली जात आहे.

ठाकरे गटाला धक्का, माजी तालुकाप्रमुखाचा पक्षत्याग

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी तालुकाप्रमुख रामा मिस्तरी यांनी पक्ष सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यामुळे ठाकरे गटाला मालेगावात धक्का बसला आहे.

अविभाजित शिवसेनेत मिस्तरी यांनी अनेक वर्षे मालेगाव महानगरप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली होती. शिवसेनेतील फुटीनंतर मालेगावातील बहुसंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता.

मिस्तरी हे मात्र ठाकरे गटातच राहिले. ठाकरे गटाने त्यांना तालुकाप्रमुख केले. अलीकडेच, ठाकरे गटाने अचानक मिस्तरी यांचेकडील पद काढून जितेंद्र देसले यांना दिले. यामुळे मिस्तरी आणि समर्थकांमधील नाराजी उफाळून आली आहे. या नाराजीतूनच त्यांनी राजीनामा दिला.

पत्रकार परिषद घेऊन मिस्तरी यांनी राजीनाम्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांच्यावर टीकास्त्र सोडले. आपल्याला कोणतीही पूर्वसूचना न देता आपले पद काढून घेण्यात आले असून त्यास हिरे हे जबाबदार असल्याचा आरोप मिस्तरी यांनी केला.

काही दिवस पक्षापासून अलिप्त राहिलेले बंडू बच्छाव यांना गेल्या महिन्यात आपण संजय राऊत यांच्याकडे घेऊन गेलो होतो. त्यानंतर बच्छाव सक्रिय झाल्याने मालेगाव बाह्य मतदार संघात उमेदवारीसाठी प्रमुख दावेदार झाले. त्याचा हिरे यांना राग आला असावा आणि त्यातून त्यांनी आपल्याला पदावरुन काढण्यासाठी षडयंत्र रचले, असेही मिस्तरी यांनी म्हटले आहे. मिस्तरी हे शिंदे गटात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कृष्णाबाई शुक्ला यांचे निधन

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : येथील कृष्णाबाई मनोहर शुक्ला (८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बुधवारी येथील झांजेश्वर अमरधामात शुक्ला यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले. पत्रकार ब्रिजमोहन आणि हेमंत शुक्ला यांच्या त्या मातोश्री होत.

शिधापत्रिकांसाठी एल्गार संघटनेचे आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : शिधापत्रिका मिळाव्यात, या मागणीसाठी एल्गार कष्टकरी संघटनेच्या वतीने नाशिक तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. तहसीलदारांनी लवकरच शिधापत्रिका देण्याचे लेखी आश्वासन दिले.

नाशिक तालुक्यातील देवरगाव, बेलगाव ढगा परिसरातील नागरिकांनी शिधापत्रिकांसाठी तहसील कार्यालयात अर्ज दाखल केले आहेत. वर्ष उलटूनही शिधापत्रिका मिळत नसल्याने एल्गार संघटनेच्या वतीने बुधवारी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. तहसीलदारांनी आंदोलकांची भेट घेत कागदपत्रांची पूर्तता योग्य पद्धतीने न झाल्याने शिधापत्रिका दिल्या नसल्याचे सांगितले. नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी ११८ प्राप्त अर्जाची पडताळणी केली. पुढील दोन ते तीन दिवसात शिधापत्रिका दिल्या जातील, असे आश्वासन तहीलदार डॉ. शोभा पुजारी यांनी दिले. लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

दोन कोटीपेक्षा अधिक वीज देयक थकबाकी

पिंपळगाव बसवंत : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पिंपळगाव बसवंत उपविभागात देयक स्वरुपात ग्राहकांकडे दोन कोटी ४० लाख ३२ हजार ६०१ रुपये थकबाकी असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता उमेश पाटील यांनी दिली.

विशेष म्हणजे पिंपळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राकडे दीड वर्षापासून तीन लाख २२ हजार ६६० रुपये थकबाकी आहे. उपविभागात २५११ ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी बंद असून त्यांच्यासाठी वीज वितरण कंपनीने अभय योजना आणली असून या योजनेचा लाभ घेऊन ग्राहकांनी आपला वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आवाहनही पाटील यांनी केले आहे. ही योजना ३० नोव्हेंबरपर्यंत असून थकीत वीज ग्राहकांना केवळ मूळ थकबाकी भरणा करावयाचा आहे. थकबाकी भरल्यास व्याज व विलंब आकार माफ केला जाणार आहे. याशिवाय थकीत बाकी भरण्यासाठी एकरकमी किंवा सुरुवातीस ३० टक्के रक्कम भरून उर्वरित रक्कम सहा सुलभ हप्त्यात भरता येऊ शकेल. थकीत देयक एकरकमी भरणा केल्यास थकबाकीतून १० टक्के सवलत देण्यात येईल. ग्राहकांनी देयक भरून वीज वितरण कंपनीस सहकार्य करावे, असे आवाहन उअभियंता पाटील यांनी केले आहे.

वागदर्डी परिसरात प्लास्टिकमुक्ती अभियान

लोकसत्ता वार्ताहर

मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'स्वच्छता ही सेवा'हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचा शुभारंभ वागदर्डी धरण परिसरात प्लास्टिकमुक्त अभियानाद्वारे करण्यात आला.

प्राचार्य डॉ. सुभाष निकम, मनमाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी शेषराव चौधरी, उपप्राचार्य डॉ. बी. एस. देसले यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. 'स्वभाव स्वच्छता,संस्कार स्वच्छता' या संकल्पनेनुसार वागदर्डी धरण परिसरात प्लास्टिकमुक्त अभियानात गणपती विसर्जनात जमा झालेले निर्माल्य व प्लास्टिक कचरा पाण्यामधून काढून एकत्र करण्यात आला.

मनमाड नगर परिषदेच्या सहकार्याने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना प्रत्येकाने स्वच्छतेसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे, कुठेही अस्वच्छता करायला नको, असा संदेश देण्यात आला. स्वयंसेवकांनी कार्यक्रमाधिकारी डॉ. पवनसिंग परदेशी, प्रा. सोमनाथ पावडे यांच्याबरोबर अभियान राबविले.

इगतपुरीतून इतर जिल्ह्यांना होणारा पाणी पुरवठा बंद करू

आरक्षणप्रश्नी शिवराम झोले यांचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : धनगर समाजाला आदिवासींमधून आरक्षण दिल्यास इगतपुरीमधून इतर जिल्ह्यांना होणारा पाणी पुरवठा बंद करण्यात येईल तसेच इगतपुरी तालुक्यातील प्रकल्प बंद करून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा माजी आमदार शिवराम झोले यांनी दिला आहे.

अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्याची धनगर समाजाची मागणी असून त्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समिती नेमली आहे. धनगर समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आरक्षण देण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी रविवारी झालेल्या बैठकीत जाहीर केले होते. त्यामुळे धनगर समाजात आनंदाचे वातावरण असताना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार शिवराम झोले यांनी अनुसूचित जमातीतून धनगरांना आरक्षण देण्यास विरोध केला आहे. धनगर समाजाला आदिवासी समाजातूनच आरक्षण का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्यास विरोध नाही. परंतु, आमच्यामधून त्यांना आरक्षण का? अशी भूमिका त्यांनी घेतली.

> धनगर समाजाला जसे चर्चेला बोलावले जाते, तसे आम्हालाही मुख्यमंत्र्यांनी बोलावले पाहिजे. आमचे नेते, मंत्र्यांना बैठकीला बोलवायला हवे होते. सरकारच्या निर्णयाविरोधात आदिवासी आमदार, नेते, संघटना सर्व एकत्र येतील. सर्व आदिवासी नेत्यांची बैठक घेऊन विरोध करायचा की न्याय मागायचा, हा निर्णय घेतला जाणार आहे.
>
> – **शिवराम झोले**, माजी आमदार

कामगार आत्महत्या रोखण्यासाठी धोरण हवे

'सिटू'ची मागणी

नाशिक : विजय सहाणे कुटूंबियांच्या आत्महत्येची सखोल चौकशी करून कामगार आत्महत्या रोखण्यासाठी धोरण आखण्याची मागणी सिटु संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

सातपूर येथील बॉश कंपनीतील कामगार विजय सहाणे यांनी पत्नी ज्ञानेश्वरी आणि कन्या अनन्या यांच्यासह बुधवारी आत्महत्या केली. कंपनीने ७०० कामगारांना कामावरून कमी केले होते. त्यात सहाणे हेही होते. न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल दिल्यावरही कंपनीकडून योग्य वागणूक देण्यात येत नव्हती, असे म्हटले जाते. यामुळे आलेल्या नैराश्यातून विजय सहाणे यांनी कुटूंबियांसह आत्महत्या केली असण्याची सर्वांची भावना असल्याचे सिटुच्या वतीने सांगण्यात आले.

आजपासून 'लेखक तुमच्या भेटीला' उपक्रमाचे २५ वे पर्व

लोकसत्ता प्रतिनिधी

> २० सप्टेंबरपासून सुरुवात होत असून २३ ऑक्टोबरला समारोप होणार असून या काळात दररोज विविध साहित्य, कथा, मुलाखती व दिलखुलास गप्पांचा अस्वाद नाशिककरांना चाखता येणार आहेत.

नाशिक : येथील ज्योती स्टोअर्स आणि शंकराचार्य न्यासचा सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने आयोजित लेखक तुमच्या भेटीला उपक्रमास २० सप्टेंबरपासून सुरुवात होत असून २३ ऑक्टोबरला समारोप होणार आहे.

दररोज सायंकाळी साडेसहा वाजता गंगापूर रोडवरील शंकराचार्य संकुल येथे लेखक तुमच्या भेटीला उपक्रमातील सर्व कार्यक्रम होणार आहेत. उपक्रमाचे यंदाचे २५ वे वर्ष असून २० सप्टेंबर रोजी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे हे महाराष्ट्र मंथन या विषयावर पहिले पुष्प गुंफतील. दुसऱ्या दिवशी प्रा. डॉ. संदेश मयेकर यांचे आधुनिक दंतउपचार, २२ रोजी मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथांमागील कथा या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. २७ सप्टेंबर रोजी डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी दिलखुलास गप्पा होणार असून सचिन जोशी मुलाखत घेणार आहेत. २८ रोजी डॉ. अजित केंभावी यांचे कृष्णविवर, गुरुत्वीय तरंग आणि लाईगो इंडिया प्रकल्प- भारताची जगाला एक महान भेट, २९ रोजी ज्येष्ठ पत्रकार रवी आमले यांचे विदेशी संस्थांच्या भारतातील कारवाया आणि कारस्थाने, १८ ऑक्टोबर रोजी रामदास पाध्ये आणि अर्पणा पाध्ये यांचे बोलविता धनी अर्थात बोलक्या बाहुल्यांविषयी व्याख्यान होणार आहे. १९ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांचे सुबत्ता भारताची- अर्थपूर्णता जीवनाची, २० ऑक्टोबर रोजी लेखक आनंद कामत आणि रितेश वेदपाठक यांचे आध्यात्मिक श्रीदत्त अनुभूती, २१ ऑक्टोबर रोजी पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे पंडित कुमार गंधर्वांचे देणे, २२ ऑक्टोबर रोजी प्राचार्य श्याम अत्रे यांचे शेक्सपियर- नाटककार की कवी? या विषयावर व्याख्यान होणार आहे. २३ ऑक्टोबर रोजी उपक्रमाचा समारोप मालपाणी उद्योग समूहाचे राजेश मालपाणी यांच्या उद्योजकाचे ओपन सिक्रेट या विषयावरील सोमनाथ राठी यांनी घेतलेल्या मुलाखतीने होईल. नाशिककरांनी कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दिग्गजांची उपस्थिती

दिग्गजांची उपस्थिती यंदाच्या लेखक तुमच्या भेटीला उपक्रमात डॉ. सदानंद मोरे, डॉ. सलील कुलकर्णी, रामदास पाध्ये, डॉ. अजित रानडे, अतुल देऊळगावकर, मोनिका गजेंद्रगडकर, प्राचार्य शाम अत्रे आदी दिग्गजांची उपस्थिती राहणार आहे. उपक्रमाचा समारोप मालपाणी उद्योग समूहाचे राजेश मालपाणी यांच्या मुलाखतीने होणार आहे.

लेखक तुमच्या भेटीला ज्ञानाचा उत्सव

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.
शाखा कार्यालय : टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) यासह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना

याद्वारा आम जनतेस आणि खालील विशेषकरून ऋणको/ सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार/ प्रतिनिधी (ऋणको) यांना सूचना देण्यात येते की, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.कडे (टीसीएचएफएल) गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता ''जसे आहे जेथे आहे'' व ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर **०७.१०.२०२४** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव याखाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/ विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/ मालमत्तेची विक्री उक्त **०७.१०.२०२४** रोजी दु. ०२.०० वा. ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेची डिमाण्ड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि., ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००२, महाराष्ट्र येथे **०५.१०.२०२४** रोजी सायं. ०५.०० वा.पर्यंत किंवा तत्पूर्वी टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकारींकडे सादर करण्यात यावा.
सुरक्षित मत्ता/ स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त वर्णनानुसार ''जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे'' या तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	लोन अका. नं. व शाखा	ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव किंमत	इसारा रक्कम ठेव	ताब्याचा प्रकार
१	TCHHL06010 00100116768 & TCHIN06010 00100118135	श्री. रमणदीपसिंह सुरिंदरसिंह गब्बी श्री. दिलशेर सिंह	रु. २५,७७,७०४/- (रुपये पंचवीस लाख सत्याहत्तर हजार सातशे चार फक्त) ॲग्रीमेन्ट नं. TCHHL060100010011 6768 अंतर्गत देणी व देय आहे आणि रक्कम रु. १,०७,९५५/- (एक लाख सात हजार नऊशे पंचावन्न फक्त) ॲग्रीमेन्ट नं. TCHIN060100010011 8135 अंतर्गत देणी व देय आहे. एकूण रुपये २६,८५,६५९/- (रुपये सव्वीस लाख पंच्याऐंशी हजार सहाशे एकोणसाठ फक्त) ---------- १३.०२.२०२३	रु. २३,५०,०००/- (रुपये तेवीस लाख पन्नास हजार फक्त)	रु. २,३५,०००/- (रुपये दोन लाख पस्तीस हजार फक्त)	प्रत्यक्ष

स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- धारण केलेला रो हाऊस नं. १, समाविष्ट तळमजला मोजमापाचा २६.०३ चौ.मी. कार्पेट + बाल्कनी मोजमापाची २.७५ चौ.मी. कार्पेट + पहिला मजला मोजमापाचा २८.६२ चौ.मी. + बाल्कनी मोजमापाचा २.७५ चौ.मी. कार्पेट अशा प्रकारे एकूण कार्पेट एरिया मोजमापाचा ६०.१५ चौ.मी. 'गणराज संकुल-२०' म्हणून ज्ञात असलेल्या योजनेतील, प्लॉट एरिया मोजमापाचा १५०.०० चौ.मी., प्लॉट नं. ७ पैकी, एकूण एरिया मोजमापाचा ३००.०० चौ.मी., सर्व्हे नं. ८५४/१बी यापैकी, व्हिलेज सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक. **पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व-** कॉलनी रोड, **पश्चिम-** ओपन स्पेस, **उत्तर-** रो हाऊस नं. २, **दक्षिण-** ओपन स्पेस.

लिलावाच्या स्थळी आम जनतेस त्यांच्या बोली व्यक्तिशः सादर करण्यास आमंत्रित करण्यात आले आहे. ऋणको/ सह-ऋणकोंना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत पुढील व्याजासह एकूण देणींचे प्रदान करण्यास शेवटची संधी देण्यात येत आहे, त्यास असमर्थ ठरल्यास अनुसूचीनुसार स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येईल. जर प्राधिकृत अधिकारींकडे व्याज व किमतीसह (विक्रीचा खर्च समाविष्ट) पूर्वोक्त देय रकमेचा भरणा केल्यास किंवा सदर सुरक्षित ऋण, व्याज व खर्च लिलाव तारखेपूर्वी प्रदान केल्याचा पुरावा त्यांच्या समाधानाखातीर प्राधिकृत अधिकारींना दिला असल्यास ई-लिलाव थांबविण्यात येईल.
कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, या विक्रीसंबंधित बोलीकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही भूमिका बजावीत असल्यास विक्री, तथापि, विकलेल्या मालमत्तेवरील कोणतेही हित संपादन करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणार नाही.
विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२ यामधील विहित आणि पुढील शर्तींच्या अनुसरणाच्या विषयाधीन राहील :
नोंद: ई-लिलाव प्रत्येकी १० मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह ०७.१०.२०२४ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान http://bankauctions.in/ या पोर्टलद्वारा आयोजिला जाईल.
शर्ती व अटी : १. याखालील अनुसूचीतील विनिर्दिष्ट तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या उत्तम माहितीच्या आधारे दिलेला आहे; परंतु निम्नस्वाक्षरीकार या उद्घोषणेतील कोणतीही चूक, असत्यकथन किंवा लोपन याकरिता उत्तरदायी नसतील. बोली रक्कम किंवा बोलीदारासंबंधित कोणताही वाद उद्भवल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकाराच्या विषयाधीन लिलावात ठेवण्यात येईल. **२.** स्थावर मालमत्ता राखीव किमतीच्या खाली विकली जाणार नाही. **३.** बोलीवृद्धी रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) असणार आहे. **४.** मालमत्तेच्या खरेदीकरिता सादर केलेल्या सर्व बोली टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.च्या नावे, देय शाखेच्या पत्त्यावर, डिमाण्ड ड्राफ्टद्वारा वर नमूद केल्यानुसार इसारा रकमेसमवेत असतील. डिमाण्ड ड्राफ्ट्स लिलावानंतर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील. एनईएफटी/ आरटीजीएस/ आयएमपीएसद्वारा इरठेच्या प्रदानाकरिता, कृपया प्राधिकृत अधिकारींशी संपर्क साधावा. **५.** उच्चतर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल, मात्र असे की तो/ ती बोलीकरिता कायद्याने अर्हताप्राप्त असावा/ असावी आणि अधिक बोली रक्कम राखीव किमतीच्या कमी नसावी. उच्चतर बोलीची स्वीकृती किंवा नापसंती प्राधिकृत अधिकारींच्या स्वेच्छाधिकारावर राहील, जेव्हा दिलेली किंमत स्पष्टपणे त्यांना अपुरी वाटल्यास त्यांना तसे करणे भाग पडल्यास. **६.** अभिलिखित कारणे देऊन विक्री स्थगित करण्याचा/ खंडित करण्याचा स्वेच्छाधिकार प्राधिकृत अधिकारींचा राहील. **७.** स्थावर मालमत्तेची पाहणी **२५.०९.२०२४** रोजी स. ११.०० व सायं. ०५.०० दरम्यान भेटीची पूर्ववेळ ठरवून करता येईल. **८.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेली व्यक्ती, सदर घोषणेनंतर त्वरित, खरेदी रक्कम/ बोली रकमेच्या पंचवीस टक्के ठेव जमा करील, ज्यामध्ये २४ तासांच्या आत प्राधिकृत अधिकारींकडे जमा करावयाची इरठे रक्कम समाविष्ट असेल आणि सदर ठेव जमा करण्यास कसूर झाल्यास मालमत्ता पुढे खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **९.** जर वरीलनुसार प्रारंभिक ठेव जमा केल्यास, देय खरेदी रकमेची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या निश्चित तारखेपासून १५व्या दिवशी किंवा तत्पूर्वी, सदर दिवस वगळता किंवा १५वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस असल्यास १५व्या दिवसानंतर येणाऱ्या पहिल्या कार्यालयीन दिवशी प्राधिकृत अधिकारींकडे खरेदीदाराद्वारा प्रदान करावयाची आहे. **१०.** वर नमूद केलेल्या कालावधीच्या आत कोणत्याही प्रदानास कसूर झाल्यास मालमत्ता खासगीरीत्या नवीन लिलाव/ विक्रीकरिता ठेवण्यात येईल. इरठेसमाविष्ट ठेव टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.द्वारा जप्त करण्यात येईल आणि कसूर करणारा खरेदीदार मालमत्तेवरील सर्व दावे गमावेल. **११.** कोणत्याही भारांचा सविस्तर तपशील, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.ला ज्ञात असलेला, ज्याकरिता मालमत्ता पात्र आहे : वरील तालिकेनुसार. दावे, जर असल्यास, मालमत्तेकरिता पुढे ठेवण्यात आलेले आहेत आणि मालमत्तेचे स्वरूप व मूल्य याबरील धारण केलेला अन्य कोणताही ज्ञात तपशील : वरील तालिकेनुसार. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्ता करावरील सांविधिक थकीत दायित्वे, विद्युत देय इ. समाविष्ट मालमत्तेवरील भारासंबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. **१२.** कोणत्याही अन्य तपशिलाकरिता किंवा ई-लिलावावरील ऑनलाइन प्रशिक्षण प्रक्रिया याकरिता भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार- मेसर्स थक्लोजर, ब्लॉक नं. ६०५ए, ६वा मजला, मैत्रिवणम कमर्शियल कॉम्प्लेक्स, अमिरपेट, हैदराबाद-५०० ०३८ तिच्या समन्वयकाद्वारे- कर्नाटक व गोवा, मोबा. नं. ८१४२०००८०९, srinivas@bankauctions.in व तेलंगणा व एपी मोबा. नं.- ८१४२०००० ६४, prakash@bankauctions.in व ओरिसा, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, एनई राज्ये, मोबा. नं.- ८१४२०००० ३०, pradhan@bankauctions.in व तामिळनाडू व केरळ, मोबा. नं.- ८१४२०००७३५, dinesh@bankauctions.in व दिल्ली, एनसीआर, पंजाब, गुजरात, हरयाणा व उत्तर राज्ये, मोबा. नं. ९५१५१६००६४, prakash@bankauctions.in व महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश, मोबा. नं.- ८१४२०००७२५, Arijit@bankauctions.in व ई-मेल : info@bankauctions.in किंवा **मनिष बन्सल, ई-मेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com प्राधिकृत अधिकारी, मोबाइल नं. ८५८८९८३६९६